त्याचे मोजमाप :-

पुर्व पश्चिम :- ८०.०० फुट, २४.३८ मिटर

उत्तर दक्षिण :- ६३.०० फुट, १९.२० मिटर

ज्याचे एकुण क्षेत्रफळ ५०४० चौ.फुट, ४६८.२२ चौ.मिटर असून यापैकी पश्चिम व उत्तर कोपऱ्याकडून असलेला कर्व्हेचरची २५ चौ.फुट जागा वजा जाता या जागेचे क्षेत्र. ५०१५ चौ.फुट, ४६४.५ चौ.मिटर इतके आहे.

त्यास चतु:सिमा :-

पुर्वेस :- सर्व्हीस लाईन

पश्चिमेस :- रस्ता

उत्तरेस :- रस्ता

दक्षिणेस :- लेआऊट प्लॉट नं.३७ (पाटील यांचे घर)

वरील प्लॉटवर आम्ही म.न.पा. अकोला यांचेकडील प्रकरण क्र. बी.पी.ए. /००३६९/२०१६-२०१७ दि. १६/१२/२०१६ अन्वये बांधकाम परवानगी घेवून यावर श्री. गजानन रेसीडन्सी या नावांने रहीवासी उपयोगासाठी इमारतीचे बांधकाम केलेले आहे या इमारती मधील पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. एफ ४ (एफ चार) ज्याचे एकुण क्षेत्र. ४८.६५ चौ.मिटर (मंजुर नकाशा प्रमाणे) व पार्किंग, जिना व लॉबी यांचा २०% लोड धरून एकुण क्षेत्र. (सुपर बिल्टअप एरीया) ५८.३८ चौ.मिटर व ३५.५१ चौ.मिटर जागेतील अविभाजीत हिश्यासह ज्यांत २ बेडरूम, १ हॉल, १ किचन, संडास, बाथरूम व बाल्कनी इ. सर्व तदंगभुत वस्तुसह स्थावर माल फ्लॅट.

त्यास चतु:सिमा :-

पुर्वेस :- फ्लॅट नं. एफ ३

पश्चिमेस :- रोड

उत्तरेस :- फ्लॅट नं. एफ १

दक्षिणेस :- पाटील यांचे घर

१) येणेप्रमाणे चतु:सिमेतील वरील वर्णनाचा पहिल्या मजल्यावरील फ्लॅट नं. एफ-४ (एफ चार) मी तुम्हांस आज रोजी या खरेदीखताद्वारे वरील भरण्याचे मोबदल्यात महाराष्ट्र अपार्टमेंट ओनरशिप अॅक्ट १९७० अंतर्गत मालकी हक्काने कायमस्वरूपी विकला आहे व सदर फ्लॅटचा प्रत्यक्ष ताबा (व्हेकंट पझेशन) आज रोजीच तुम्हांस दिला आहे.सदरचा फ्लॅट हा एक्स्ट्रा वर्क्स सह तुम्हांस आम्ही विकला आहे.

२) सदरहू फ्लॅटवर आजपासून तुमची मालकी झाली, माझा किंवा माझे इस्टेट वारसांचा कोणताही मालकी हक्क, हित संबंध अथवा ताबा राहीला नाही. या फ्लॅटचा तुम्ही मालकी हक्कांने वंशपरंपरा पुर्ण उपभोग घ्यावा.

३) या फ्लॅटमध्ये फक्त छतापर्यंत व आंतील बाजू तुमचा मालकी हक्क मर्यादित राहील या व्यतिरिक्त कॉमन वापराच्या जागेवर किंवा या इमारतीचे छतावर तुमचा कोणताही मालकी अथवा व्यक्तीगत अधिकार राहणार नाही या फ्लॅट मध्ये तुम्हांस असा कोणताही बदल करता येणार नाही कि, ज्यामुळे इमारतीस धोका निर्माण होईल तसेच तुम्हांस इमारतीचे नावांमध्ये बदल करता येणार नाही.

४) तुम्हांस या खरेदीखताने विकलेल्या फ्लॅटची नोंद जागेतील अविभाजीत हिश्यासह तुम्ही तुमचे नावांने संबंधित शासकिय रेकॉर्ड मध्ये परस्पर करवुन घ्यावी त्यास माझी हरकत राहणार नाही व नोंद होण्यासाठी लागणारे आवश्यक सह्या व सहकार्य मी तुम्हांस देईन.

५) सदरहू स्थावर मालमत्ता (फ्लॅट) ही पुर्णपणे निर्विवाद असून यावर कोणचाही कोणत्याही प्रकारचा कर्ज, बोजा, गहाण, दान, बक्षीस इत्यादी नाही अथवा कोणासही कोणत्याही इतर लेखान्वये लिहुन दिलेले नाही. तसे काहीही निघाल्यास किंवा तुमचे मालकी हक्कांसह अथवा ताब्यास बाधा आल्यास मी जबाबदार राहून तुमचे होणारे पुर्ण नुकसान भरून देईन.

करीता हे स्थावरचे खरेदीखत आम्ही आमचे राजीखुशीने खालील दोन साक्षीदारासंमक्ष लिहुन दिली ती आम्हांला व आमचे इस्टेट वारसांस लागु (बंधनकारक) असे.

अकोला.

दिनांक :- ०८/११/२०१७

साक्षीदार

लिहुन देणार

१.------------------------

१.----------------------------

श्री.गजानन रेसीडन्सी तर्फे भागीदार :-

श्री.विलास शालीग्रामजी तायडे

२.----------------------------

श्री.प्रशांत गजानन सुजदेकर

३.----------------------------

श्री.सचिन गजानन तिडोळे

४.----------------------------

श्री. संतोष सुधाकरराव लोखंडे

लिहुन घेणार

२.------------------------

--------------------------